जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUN 2021
तरूण भारत

## थोडक्यात महत्त्वाचे

# डॉ. निरंजना चव्हाण यांना जागतिक स्तरावरील शास्त्रज्ञांमध्ये नामांकन

**कोल्हापूर :** वनस्पतीशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ



कोल्हापूर येथे ॲडजंक्ट प्रोफेसर या पदावर कार्यरत असणाऱ्या डॉ. निरंजना सुनील चव्हाण यांना जागतिक स्तरावरील नामांकित शास्त्रज्ञानांमध्ये मानांकन मिळाले. जागतिक स्तरावर विविध नामांकित संस्था मार्फत वेगवेगळया क्षेत्रात काम करणाऱ्या शास्त्रज्ञांचे मानांकन ठरवले जाते. सन २०२१ साठी नुकतेच AD Scientific index तर्फे १६७ देशामधील दहा हजारावर संशोधन संस्था तसेच विद्यापीठातील शास्त्रज्ञांची यादी प्रसिद्ध केली. या नामांकित २ टक्के शात्रज्ञांच्या यादीमध्ये डॉ. निरंजना चव्हाण यांनी Agriculture/Forestry /Plant Sciences या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळवले आहे. २०१७ मध्ये त्यांना राष्ट्रीय शैक्षणिक पुरस्कारांनी सन्मानित केले. तसेच मॅन्ग्रोव्ह सोसायटी ऑफ इंडियाची फेलोशीप व संशोधन पुरस्कार प्रदान करण्यात आले. खारफूटी सरंक्षण व संवर्धन पर्यावरण या विषयात गेली ३७ वर्षे त्यांनी मोलाचे संशोधन केले इंडियन वूमन सायंटिस्ट असोसिएशन, कोल्हापूर बॅच च्या संयोजिका म्हणून कार्यरत आहेत.

0 3 JUN 2021 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील संशोधकांची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल

## डॉ. जाधव, डॉ. गायकवाड, डॉ. चव्हाण यांचा समावेश

### » ए.डी.सायन्टिफिक इन्डेक्सचे मानांकन

कोल्हापूर, ता. २ : ए.डी. सायन्टिफिक इन्डेक्सने जागतिक स्तरावरील संशोधकांची यादी प्रसिद्ध केली. यामध्ये १६७ देशांतील ५ लाख शास्त्रज्ञांचा समावेश आहे. शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातील डॉ. निखिल गायकवाड, डॉ. निरंजना चव्हाण यांना मानांकन मिळाले आहे. तसेच जीवशास्त्र विभागातील प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनाही या संस्थेचे मानांकन मिळाले आहे. यामुळे लौकिकात भर पडली असून संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली गेली आहे.

संशोधन क्षेत्रात या मानांकनाला विशेष महत्त्व आहे. यामध्ये पाच वर्षांतील संशोधन पेपर, एच इंडेक्स, आय १० इंडेक्स आणि सायटेशन या निकषावर संशोधकांचे मूल्यमापन केले जाते. डॉ. ज्योती जाधव यांना हे मानांकन 'इंजिनिअरींग आणि टेक्नॉलॉजी, बायोमेडिकल इंजिनिअरींग (बायोरेमडिएशन आणि न्यूरोडीजेनेरिटिव्ह डिसीझेस) या विषयामध्ये मिळाले आहे. त्यांनी विविध विषयांवर संशोधन पेपर सादर केले असून त्यांच्या नावावर दोन पेटंटही आहेत. त्यांनी आत्तापर्यंत अमेरिका, लंडन, दक्षिण कोरिया, पोर्तुगाल या देशांतील शास्त्रज्ञांबरोबर एकत्रित काम केले आहे. पर्यावरण व्यवस्थापन आणि संरक्षण या विषयातही त्यांचे कार्य आहे. वस्त्रोद्योगातील औद्योगिक सांडपाण्यावरील सेंद्रिय प्रक्रियेद्वारे प्रक्रिया करण्याचे तंत्र विकसनामध्ये त्यांचे योगदान आहे. डॉ. निखिल गायकवाड १९ वर्षांपासून सायटोजेनेटिक्स अँड प्लांट ब्रीडिंग, म्युटेशन ब्रीडिंग, प्लांट टिश्यूकल्चर, बायोप्रॉस्पेक्शन ऑफ मेडिसिनल प्लांट्स या क्षेत्रात संशोधन करत आहेत. अ‍ॅग्रीकल्चर, फौरेस्ट्री अँड प्लांट सायन्सेस या क्षेत्रातील शास्त्रज्ञांमध्ये त्यांना मानांकन मिळाले आहे. याच क्षेत्रात डॉ. निरंजना चव्हाण यांना मानांकन मिळाले आहे. तसेच मॅन्ग्रोव्ह सोसायटी ऑफ इंडियाची फेलोशिप व संशोधन पुरस्कार प्रदान करण्यात आले. खारफुटी सरंक्षण व संवर्धन पर्यावरण या विषयात संशोधन केले. इंडियन वूमन सायंटिस्ट असोसिएशन, कोल्हापूर ब्रँचच्या संयोजिका म्हणून त्या कार्यरत आहेत.


डॉ.ज्योती जाधव


डॉ.निखिल गायकवाड


डॉ.निरंजना चव्हाण



0 3 JUN 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर बनू शकते 'सायकल सिटी'

## शहरात ३५ जण आयर्नमॅनचे मानकरी : सायकलींचा वापर वाढतोय; विद्यापीठात लवकरच सायकलिंग ट्रॅक




कोल्हापूर : विजय पाटील

**आपलं कोल्हापूर म्हणजे क्रीडानगरी. लाल मातीतल्या कुस्तीची पंढरी. नेमबाजी, जलतरण, बुद्धिबळ अशा कित्येक क्रीडा प्रकारात कोल्हापूरच्या तरुणाईने जागतिक पताका फडकवली आहे. त्यामुळेच शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम ठेवणाऱ्या सायकलिंगकडेही कोल्हापूरकरांचा कल वाढतोय. थोडे प्रयत्न केले तर कोल्हापूर हे 'सायकल सिटी' या बिरुदाने देशभर ओळखले जाऊ शकेल.**

३ जून हा दिवस जगभर 'सायकल डे' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने एप्रिल २०१८ ला जागतिक सायकल दिन जाहीर केला. अलीकडे भारतातील सायकलींचा वापर वाढू लागला आहे. शारीरिक तंदुरुस्तीसाठी सायकलिंग हा विषय तरुणांसह जपानमध्येही रुजू लागला आहे. तुलनेने कोल्हापूरसारख्या क्रीडेचे माहेर मानल्या जाणाऱ्या शहरात सायकलिंगचा वेग निश्चितपणे जास्त आहे.

कोल्हापूर शहरात ३५ जणांनी 'आयर्न मॅन' किताब मिळवला आहे. कदाचित इतक्या मोठ्या संख्येने 'आयर्न मॅन' हा बहुमान मिळवणारे हे एकमेव शहर असेल. आयर्न मॅनसाठी धावणे आणि पोहणे ५० टक्के आणि सायकलिंग पन्नास टक्के असे समीकरण असते. यावरून जागतिक स्तरावर सायकलिंगचे महत्त्व दिसून येते.

कोल्हापूर शहरात सायकलींचे अनेक ग्रुप स्थापन झाले आहेत. कोल्हापूर ते जोतिबा डोंगर, कोल्हापूर ते पन्हाळा, कोल्हापूर ते बेळगाव असे रोज सायकलिंग करणारे ग्रुप आहेत. सध्या लॉकडाऊनचा अपवाद वगळला, तर कोल्हापूरकर आणि सायकल हे नवे समीकरण रुजू लागले आहे. कोल्हापुरात सायकलींचे प्रमाण वाढले असल्याने जिल्हा प्रशासनाच्या वतीने शिवाजी विद्यापीठात सायकलिंग ट्रॅक साकारण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सायकलवीरांसाठी ही आनंदाची बाब आहे.



### सायकलींचे अनोखं जग...

- सध्या जगभरात शंभर कोटी सायकल चालवल्या जातात
- सायकलिंगमुळे जगभरात २३८ दशलक्ष इंधनाची बचत होते
- कारच्या तुलनेत जगात सायकलींची संख्या दुप्पट झाली आहे
- वर्षभरात दहा कोटी सायकलींचे उत्पादन केले जाते
- एका मोटारीसाठी लागणाऱ्या पार्किंगच्या जागेत १५ सायकली ठेवता येतात
- इंग्लंडमध्ये वीस लाखांपेक्षा जास्त सायकल वापरल्या जातात
- न्यूयार्कमध्ये दहा टक्के नागरिक कामासाठी सायकल वापरतात
- नेदरलँडमध्ये ८ पैकी ७ तरुणांकडे सायकल आहे.